# मॅन्युअल २

## प्रस्तावना संस्था, संस्थेची कार्ये, व कर्तव्ये यांचा तपशील

| | |
|---|---|
| २.१ | मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ६१ (ह)नुसार कत्तलखाने बांधणे व त्याचे विनिमयन करणे ही महानगरपालिकेची अनिवार्य कर्तव्य आहे. |
| २.२ | देवनार पशुवधगृह ही महानगरपालिकेची नफ्याचा विचार न करता नागरी आरोग्यास प्राधान्य देणारी घटक संस्था आहे. याच्या सेवेचा फायदा सर्वसामान्य जनता, दुकानदार, व्यापारी इ. घटकांना होत आहे. |
| २.३ | देवनार पशुवधगृह हे महानगरपालिकेचे सेवा पुरविणारे अद्ययावत असे पशुवधगृह आहे. जागतिक कृषि संघटनेचे सल्लागार श्री.एन.ई.वेनबर्ग यांनी सुचविलेल्या आराखडयानुसार मे.डब्ल्यू जे.पॉवेल, यांनी मे.स्टील प्लान्ट प्रा.लि. मुंबई, या कंपनीच्या सहकार्याने या वधगृहाची उभारणी केली. याचे बांधकाम ऑक्टोबर १९६७ ला सुरु होऊन वर्ष १९७१ ला संपले. यंत्र सामुग्रीसह पशुवधगृह उभारणीचा खर्च रु.४.५ कोटी इतका आला. १६ ऑगस्ट १९७१ ला येथे पहिल्यांदा काम सुरु झाले. शहरातील तसेच वांद्रे, कुर्ला येथील पशुवधगृहे बंद करुन एप्रिल १९७२ मध्ये संपूर्णत क्षमतेने काम सुरु झाले.<br>देवनार पशुवधगृहाचा परिसर एकूण ६४ एकराचा आहे. |
| २.४ | वधासाठी आणलेल्या शेळया मेंढया, शृंगी जनावरे यांना बाजार भरविण्यास जागा उपलब्ध करुन देणे, तसेच जनावरांची वधपूर्व व वधोत्तर तपासणी करुन, स्वच्छ, सकस व ताजे मांस उपलब्ध करुन देणे हे पशुवधगृहाचे कर्तव्य आहे. |
| २.५ | **मुख्य कार्ये**<br>१.अनुज्ञाप्ती पत्र देणे, शृंगी जनावरांच्या वधाच्या वेळा निश्चित करणे, पशुवधगृहाचे अन्न कायदे व म.न.पा. उपविधी 461(के,ल,म,न.), 462 याद्वारे नियमन करणे.<br>२.देवनार पशुवधगृहाचे तसेच तेथील बाजाराचे परिरक्षण करणे.<br>३.विहित पशुवध शुल्क आकारुन अनुज्ञाप्तीधारकांनी आणलेल्या जनावरांचा वध करुन देणे.<br>४.उपउत्पादनांची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे.<br>५.बाजार विभागाचे दक्षता पथक अनधिकृत वधाच्या उद्देशाने आणलेली शृंगी जनावरे, शेळया, मेंढया व वराह पकडतात त्याप्रमाणे अनधिकृतरित्या विक्रीस आणलेले मांस पकडतात. शेळया/मेंढया ठेकेदारास दिल्या जातात. वराह, म्हशी, म्हशीचा पाडा हे लिलाव पध्दतीने अनुज्ञाप्तीधारकास दे.प.गृह येथे वध करण्याकरिता दिली जातात, वधास अयोग्य जनावरे मुंबई जिवदया मंडळ यांच्या ताब्यात विहित शुल्क स्विकारुन दिली जातात. पकडलेले मांस हे नागरिकांस खाण्यास अयोग्य असल्याने शास्त्रोक्त पदधतीने नष्ट केले जाते. |

| | |
|---|---|
| | ६.बकरी ईद साठी विशेष बाजाराचे, तसेच वधाचे नियमन करणे.<br>७.धार्मिक कारणास्तव फक्त शेळया मेंढया घेवून जाण्यासाठी धार्मिक परवाना देणे. |
| २.६ | पशुवधगृहात खालील सुविधा आहेत<br>१. जनावरे उतरण्यासाठी धक्का<br>२. शेळया/मेंढया व शृंगी जनावरांसाठी स्वतंत्र बाजार<br>३. विहित पशुवधगृहाचे प्रशस्त निवारागृहे<br>४. शेळया/मेंढया शृंगी जनावरे, व वराह यासाठी स्वतंत्र वधगृहे<br>५. ताजे पाणी पुरविणारे उंदचन केंद्र<br>६. बाह्य प्रवाही प्रक्रिया संयंत्र व सांडपाणी<br>७. महापालिका कर्मचा-यांसाठी दवाखाना<br>८. मांसवाहिनी यानगृह<br>९. कामगार,व्यापारी,दुकानदार इ. साठी शाकाहारी व मांसाहारी उपाहारगृहे<br>१०.व्यापारी, दलाल,गवाल,कामगार इ.साठी निवा-याची व्यवस्था.<br>११.कार्यालयीन इमारत<br>१२.गुणनियंत्रण प्रयोगशाळा<br>१३.निसर्गपुरक तंत्रज्ञानावर आधारित बायोगॅस प्रकल्प<br>१४.पशुवधगृहाच्या परिसरात देवनार पोलीस ठाणे आहे. |
| २.७ | १. महापालिकेकडून अनुज्ञापत्रप्राप्त दुकानातून मांसाची खरेदी करणे, असे जनतेस आवाहन करण्यात येते.<br>२. धार्मिक कारणासाठी नागरिकांनी परवाना घ्यायला येताना सोबत ओळखपत्र व रहिवाशी असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत घेऊन यावे. |
| २.८ | बकरीईदच्या कालावधीत जनतेसाठी विशेष सोयी पुरविल्या जातात. |
| २.९ | जनतेच्या अडचणी सोडविण्यास सक्षम अधिका-याची नेमणूक केलेली आहे. |

# देवनार पशुवधगृह

## व्यवस्थापन रचना तक्ता

### महाव्यवस्थापक

